# अंतःशुद्धीचे सोपान

*यामधून एक अंश*

मी आज सकाळी घडलेली एक घटना सांगते. मी आश्रमाच्या एका कॉरिडॉर्‌मधून जात होते. तेथील एका खोलीचा दरवाजा उघडा होता. म्हणून मी डोकावून पाहिले, तर पलंगावर पुष्कळ पुस्तकांचा ढीग होता. पुस्तके आणि कागदांच्या ढिगांच्या अनेकविध राशी होत्या. मला मोठे कुतूहल वाटले.

मी काही सेकंद तेथे थांबले आणि मग हलकेच दरवाज्यावर थाप मारून त्या सद्‌गृहस्थांचे लक्ष वेधून घेतले जे त्या वेळी त्या खोलीत राहत होते. ते एक प्रोफेसर होते. ते हातभर पुस्तके घेऊन झुकलेले होते. दरवाज्यावरील थाप ऐकून त्यांनी वर बघितले, तर त्यांचा चष्मा घसरून नाकावर आला. अगदी एका खऱ्या प्रोफेसरप्रमाणे चष्म्याच्या काचेवरून माझ्याकडे न्याहाळून पाहत ते म्हणाले, “ओह, ओह!”

मी त्यांना हालहवाल विचारली. त्यांनीही सहृदयतेने उत्तर दिले. ते मला सांगू लागले की, त्यांना कसे वाटते आहे आणि त्यांच्या आयुष्यात कायकाय घडते आहे. जेव्हा ते बोलत होते, तेव्हा मला अचानक शिर्डीच्या साईबाबांचा चेहरा दिसला. जेव्हा मी साईबाबांचा चेहरा पाहिला तेव्हा मला आठवले, की त्या दिवशी सकाळी ध्यानातून बाहेर येताना अगदी असेच घडले होते.

मला साईबाबांचे मुखकमल दिसले होते—अत्यंत उज्ज्वल, तेजस्वी श्वेत, देदीप्यमान. साईबाबांनी मला सांगितले होते की, मी त्यांच्या निवासस्थानी, शिर्डीमध्ये गायली जाणारी प्रातःकालीन ‘पादुका आरती’ गावी.

आपल्यापैकी काही जणांनी कदाचित शिर्डीच्या साईबाबांबद्दल ऐकले नसेल. ते एक महान संत होते, जे या शतकाच्या आरंभी, भारताच्या महाराष्ट्र राज्यात राहत होते. आजही लाखो-करोडो लोक शिर्डीची यात्रा करतात, जेथे त्यांची समाधी आहे आणि अनेकांना त्यांचे अद्‌भुत आशीर्वाद मिळतात. साईबाबांविषयी केवळ विचार केल्यानेही त्यांचे आशीर्वाद प्राप्त होतात.

माझ्या ध्यानामध्ये प्रकट होऊन जेव्हा त्यांनी मला ती प्रार्थना गाण्यास सांगितले, तेव्हा मी खेदपूर्वक सांगितले, “मला ती मुखोद्‌गत नाही.” साईबाबा पुन्हा म्हणाले, “गा!”

म्हणून, मी ध्यानामध्ये तो कागद शोधायला लागले, ज्यावर ती प्रार्थना लिहिली असायला हवी होती. मला तो कागद कुठेही सापडला नाही. हे सर्व करताकरता मी ध्यानातून बाहेर आले.

आता काही तासांनंतर, मी त्या प्रोफेसरांच्या दरवाज्यापाशी उभी असताना, साईबाबांचा चेहरा पुन्हा प्रकट झाला. ते प्रोफेसर मोठ्या मृदुलतेने, विनयाने तसेच मधुरतेने व प्रेमाने बोलत होते आणि मी त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा साईबाबांचा चेहरा पाहत होते. मनातल्यामनात मी साईबाबांना विचारले, “आज आपण अशा प्रकारे का प्रकट होत आहात?”

आणि त्यांचे उत्तर होते, “अभय. मी लोकांना हेच तर देतो : अभय.”

जेव्हा प्रोफेसरांचे बोलणे संपले, तेव्हा साईबाबांचा चेहराही लुप्त झाला. प्रोफेसरांचा निरोप घेऊन मी निघून गेले. साईबाबांना हे नक्कीच माहीत असावे, की मी आज रात्री आपणा सर्वांशी अभय या विषयावर बोलणार आहे.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग*, अध्याय १ “अभय,” यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. १४-१५.